जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


2 8 MAR 2025

पुण्यनगरी

# डॉ. शोभना जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्तीसाठी ११ लाखांची देणगी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजाराम महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्राच्या दिवंगत प्राध्यापिका डॉ. शोभना जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यासाठी त्यांचे पती अशोक जाधव यांनी शिवाजी विद्यापीठास ११ लाख रुपयांची देणगी दिली. अशोक जाधव यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे ११ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.



कोल्हापूर : प्राध्यापिका डॉ. शोभना जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यासाठी त्यांचे पती अशोक जाधव यांनी शिवाजी विद्यापीठास ११ लाख रुपयांची देणगी दिली.

सूक्ष्मजीवशास्त्र या विषयात पदवी स्तरावर सर्वोत्कृष्ट गुणवत्तापूर्ण कामगिरी बजावणाऱ्या दोन विद्यार्थिनी आणि एक विद्यार्थी यांना शोभना जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी कुलगुरूंच्या हस्ते जाधव यांचा ग्रंथ, शाल आणि विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, दुर्गाली गायकवाड, भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे, एस. पी. वेलचे, अनिल पाटील, सर्जेराव पाटील, राजेश गायकवाड, उदय टिकेकर, तेजराज पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2025
सकाळ

# डॉ. शोभना जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्तीसाठी ११ लाखांची देणगी

कोल्हापूर, ता. २७ : येथील राजाराम महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्राच्या दिवंगत प्राध्यापिका डॉ. शोभना जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यासाठी त्यांचे पती अशोक जाधव यांनी गुरुवारी शिवाजी विद्यापीठास अकरा लाख रुपयांची देणगी दिली.

जाधव यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे अकरा लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. सूक्ष्मजीवशास्त्र या विषयात पदवी स्तरावर सर्वोत्कृष्ट गुणवत्तापूर्ण कामगिरी बजावणाऱ्या दोन विद्यार्थिनी आणि एक विद्यार्थी यांना डॉ. जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते श्री. जाधव यांचा ग्रंथ, शाल आणि विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, दुर्गाली गायकवाड, भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे, अनिल पाटील, सर्जेराव पाटील, राजेश गायकवाड, उदय टिकेकर, तेजराज पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2025
पुण्यनगरी

# यशासाठी धैर्य, आत्मविश्वास आवश्यक

## प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थिनींनी यशापर्यंत पोहोचण्यासाठी चिकाटी, सकारात्मक दृष्टिकोन, धैर्य आणि आत्मविश्वास हे गुण अंगी बाणवावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या 'होस्टेल डे' कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी होस्टेल डेच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचाही सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनीही मार्गदर्शन केले.

वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत केले. अधीक्षक डॉ. कविता वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. डॉ. मीना पोतदार यांनी आभार मानले. डॉ. नीलांबरी जगताप यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2025

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात हॉस्टेल डेचे उद्घाटन करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. कविता वड्राळे आदी.

# 'यशासाठी चिकाटी, धैर्य आणि आत्मविश्वास आवश्यक'

कोल्हापूर : विद्यार्थिनींनी यशापर्यंत पोहोचण्यासाठी चिकाटी, सकारात्मक दृष्टिकोन, धैर्य आणि आत्मविश्वास हे गुण अंगी बाळगावेत, असे मत प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या 'होस्टेल डे' कार्यक्रमात ते बोलत होते. हॉस्टेल डेच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचाही सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. रामचंद्र पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थिनींनीही मनोगत व्यक्त केले. वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अधिक्षक डॉ. कविता वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. डॉ. मीना पोतदार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नीलांबरी जगताप यांच्यासह विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2025

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात राज्याच्या अर्थसंकल्पावर चर्चा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पावर चर्चा झाली. अर्थतज्ज्ञांमध्ये मतमतांतरे झाली. प्रत्येकांनी त्यांना भावलेल्या अर्थसंकल्पावर मांडणी केली. अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. डॉ. देशमुख यांनी अर्थसंकल्प, उत्पन्न व खर्चाचे पैलू, अर्थसंकल्पाचा आकार, वित्तीय तूट यावर चर्चा केली. एस. पी. पंचगल्ले यांनी उद्योग, कर व शिक्षण क्षेत्रातील तरतुदींवर चर्चा केली. नितीन हरगुडे, सारंग जाधव, डॉ. एस. टी. कोंबडे यांनी आपले विचार मांडले. 'स्किल इंडिया मिशन' दुय्यम क्षेत्राचा वाटा आणि रोजगार निर्मिती मांडणी केली. नितीन हरगुडे यांनी महाराष्ट्र व भारतातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर संकलन, तसेच भारताच्या आर्थिक विकासातील महाराष्ट्राच्या योगदानावर प्रकाश टाकला. भांडवली खर्च, रोजगार व उद्योगस्नेही धोरणांविषयी विचारणा केली. स्वागत, प्रास्ताविक डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले. डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. नितीन हरगुडे, सारंग जाधव, प्रा. एस. टी. कोंबडे, एस. पी. पंचगल्ले, डॉ. दिग्विजय पाटील, डॉ. रश्मी गोधी यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2025
तरुण भारत

# 'महिला सक्षमीकरणाचे आदर्श उदाहरण अहिल्यादेवी होळकर'



- लेखिका विनिता तेलंग यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य म्हणजे महिला सक्षमीकरणाचे मोठे आदर्श उदाहरण आहे, असे प्रतिपादन लेखिका विनिता तेलंग यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्वत्ता परिषद आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्याच्या उद्घाटन प्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य व महिला सबलीकरण' या विषयावर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विद्यापीठातील अहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे होते.

तेलंग म्हणाल्या, अहिल्यादेवींनी केवळ धार्मिक कार्य केले, असे नव्हे, तर त्याचबरोबरीने अनेक लोककल्याणकारी कामे त्यांनी केली. महिला सक्षमीकरणाचे त्या स्वतः प्रतीक होत्या. पण त्यांच्यामुळे राज्यातील इतर महिलांसाठीही त्यांचे कर्तृत्व प्रेरणादायी ठरले. आजही त्यांचे कार्य स्फूर्तीदायक आहे. त्यांचे कार्य देशातील प्रत्येकासाठी महत्त्वाचे असून त्याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या चरित्रापासून नव्या पिढीने सर्वसमावेशक,सर्वव्यापक हिंताचा बोध घ्यावा आणि त्याप्रमाणे जीवन व्यतीत करावे. अहिल्यादेवींचा आदर्श घेऊन लोककल्याणाचे राजकारण, समाजकारण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

दुसऱ्या सत्रात सुखदेव थोरात यांचे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे राजकीय, सामाजिक धोरण आणि प्रशासकीय कार्य' यावर व्याख्यान झाले. सांस्कृतिक कार्य विभागाचे चंद्रकांत पाटील यांनी स्वागत केले. प्रशांत आयरेकर यांनी सूत्रसंचालन केले. दत्तात्रय घोटुगडे यांनी आभार मानले. यावेळी इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, सामाजिक कार्यकर्ते बबनराव रानगे, शहाजी सिद, प्रा. लक्ष्मण करपे, डॉ. संतोष कोळेकर, विद्यार्थी उपस्थित होते.

### गौरवगाथा आणि सांस्कृतिक कार्यक्रम

कार्यक्रमाच्या अखेरच्या सत्रात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची गौरवगाथा व सांस्कृति क कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये अहिल्यादेवींची जीवनगाथा सांगणारी नाटिका, गीते, पोवाडे, ओव्या, लोकगीते व पारंपरिक नृत्यांचा समावेश होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2025
सकाळ

# अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य मोठा आदर्श

## विनिता तेलंग; विद्यापीठात विद्वत्ता परिषद

■ सकाळ वृत्तसेवा



विनिता तेलंग

कोल्हापूर, ता. २७ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य म्हणजे महिला सक्षमीकरणाचे मोठे आदर्श उदाहरण आहे. त्यांच्या चरित्रापासून नव्या पिढीने सर्वसमावेशक, सर्वव्यापक प्रेमाचा, सर्वांच्या हिताचा बोध घ्यावा आणि त्याप्रमाणे जीवन व्यतित करावे, असे आवाहन लेखिका विनिता तेलंग यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठातर्फे बुधवारी विद्वत्ता परिषद आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी प्रथम सत्रात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य व महिला सबलीकरण' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे होते.

दुसऱ्या सत्रात सुखदेव थोरात यांचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे राजकीय, सामाजिक धोरण व प्रशासकीय कार्य या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी डॉ. प्रभंजन माने, बबन रानगे, शहाजी सिद, लक्ष्मण करपे, संतोष कोळेकर उपस्थित होते. अखेरच्या सत्रात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची गौरवगाथा व सांस्कृतिक कार्यक्रम झाला. त्यात अहिल्यादेवींची जीवन गाथा सांगणारी नाटिका, गीते, पोवाडे, ओव्या, लोकगीते, पारंपरिक नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. सांस्कृतिक कार्य विभागाचे चंद्रकांत पाटील यांनी स्वागत केले. प्रशांत आयरेकर यांनी सूत्रसंचालन केले. दत्तात्रय घोटुगडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 MAR 2025

लोकमत

# विद्यापीठाच्या परीक्षा दोन एप्रिलपासून

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २०२४-२५ मधील उन्हाळी सत्रामधील विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांना २ एप्रिलपासून प्रारंभ होणार आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे २ लाख २५ हजार विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. यात पदवी, पदव्युत्तर, कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणाशास्त्र, सर्व डिप्लोमा, सर्टिफिकेट, बी.व्होक., 'वायसीएसआरडी'कडील अभ्यासक्रम तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, टेक्स्टाइल, बी.टेक., विधी, एमबीए, एम.फिल., पीएच.डी. कोर्सवर्कचा यात समावेश आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ३०० महाविद्यालये आणि



विद्यापीठातील ४० अधिविभागात परीक्षा वेळापत्रकानुसार २ एप्रिलपासून बी.व्होक. अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू होतील. त्यानंतर ३ एप्रिल रोजी बीए., बी.कॉम., त्यानंतर १२ एप्रिलला बीएस्सी व इतर अभ्यासक्रम आणि २१ एप्रिलपासून एमए, एम.कॉम., एमएस्सीच्या परीक्षा सुरू होतील. परीक्षेच्या तारखा लक्षात घेऊन महाविद्यालय, अधिविभागांनी वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी, अशा सूचना विद्यापीठाने केल्या आहेत.

2 8 MAR 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


मस्ट READ

# विद्यापीठाच्या संशोधकाकडून नवीन गोगलगायीचा शोध

## रत्नागिरीतील अणसुरेजवळ आढळली नवीन प्रजाती

संदीप आडनाईक
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोकण किनारपट्टीजवळच्या पश्चिम घाटातील जंगलात शिवाजी विद्यापीठाचे संशोधक डॉ. अमृत भोसले यांनी नवीन गोगलगाईच्या प्रजातीचा शोध लावला. रत्नागिरी जिल्ह्यातील अणसुरे येथील देव गिरेश्वर मंदिराजवळ गोगलगायीची ही नवीन प्रजात आढळली. कोकणात आढळल्यामुळे 'थिओबालडियस कोंकणेंसिस' असे या नव्या प्रजातीचे नामकरण केले आहे.



प्रा. दहिवडी कॉलेजचे संशोधक प्रा. डॉ. अमृत भोसले यांनी शिवाजी विद्यापीठातून गोगलगाय आणि शिंपले या विषयावर पीएच. डी. पूर्ण केली. ते सध्या पश्चिम घाटातील गोगलगाईवर संशोधन करत आहेत. ठाकरे वाइल्डलाइफचे संशोधक तेजस ठाकरे व अक्षय खांडेकर, मेढा येथील प्रा. डॉ. ओमकार यादव, नॅचरल हिस्ट्री म्युझियम लंडनचे डॉ. टॉम व्हाइट आणि राजराता विद्यापीठ श्रीलंकाचे संशोधक डॉ. दिनारझार्दे रहीम या संशोधकांनी त्यांना मदत केली.

### शंखाची वेगळी रचना

या गोगलगाई समुद्रसपाटीपासून ८० ते २४० मीटर उंचीवरील जंगलांत आढळतात. शंखाच्या व शंखाच्या झाकणावरच्या काही वैशिष्ट्यांमुळे इतर थिओबालडियस वंशातील गोगलगाईंच्या प्रजातींपेक्षा ही वेगळी आहे. शंखाची रचना, लांबी, रुंदी, तोंडाजवळ विशिष्ट प्रकारची कडा व शंखाच्या झाकणावरील छोट्या काट्यांसारख्या रचना ही वैशिष्ट्ये या प्रजातीत आढळली.

"

कोकणातील गोगलगाईबद्दल तुलनेने कमी संशोधन झाले. स्थानिक परिसंस्थेमध्ये या नवीन प्रजातीची भूमिका समजून घेण्यासाठी तसेच जैवविविधतेसाठी या गोगलगाईवर सखोल संशोधन करण्याची गरज आहे.

**-डॉ. अमृत भोसले, संशोधक**